भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक- ५/८/२०१९

# प्रेसनोट

## सिंहगड कॉलेज कॅम्पस मध्ये मोबाईलची चोरी करणारा अटकेत

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

सुमारे दोन ते तीन महीन्यापासुन सिंहगड कॉलेज कॅम्पस आंबेगाव बु।। परिसरात सिंहगड कॉलेजमधील विदयार्थ्याचे सकाळच्या वेळी मोबाईल चोरीचे गुन्हे घडलेले होते त्या अनुषंगाने भारती विदयापीठ पोलीस ठाणे तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री पाटील व त्यांची टिम भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत पेट्रोलींग करीत असताना दिंनाक १/८/२०१९ रोजी तपास पथकातील पोलीस नाईक **समीर बागसिराज व प्रणव संकपाळ** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सिंहगड कॉलेज कॅम्पस आंबेगाव बु।। परिसरात सिंहगड कॉलेजमधील विदयार्थ्याचे सकाळच्या वेळी मोबाईलच्या चो-या या भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे अमर समुकराव याने केलेल्या असुन तो चोरीचे मोबाईल विक्री करणेसाठी भारती विदयापीठ बॅक मार्केट या ठिकाणी थांबलेला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर मिळालेले बातमीवरुन रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे **अमर वैजनाथ समुकराव वय.१९ वर्ष रा.मु.पांढरगाव पो. इसाद ता.गंगाखेड जि परभणी** यांस ताब्यात घेतले असता त्याचे कब्जामध्ये एकुण कि,रु ८३,०००/- चे ६ महागडे मोबाईल हॅन्डसेट आल्याने त्याचेकडे त्याबाबत अधिक चौकशी करता त्याने ते सिंहगड कॉलेज कॅम्पस आंबेगाव बु।। व आजुबाजुच्या परिसरातुन चोरी केलेबाबत सांगितलेने सदरचे एकुण ६ मोबाईल हॅन्डसेट जप्त करून चोरीचे भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील ४ चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

वरील आरोपी यांस नविन नविन चित्रपट बघण्याची हौस असल्याने ती हौस पुर्ण करणेसाठी तो परभणी येथुन रात्री निघुन पुणे येथे सकाळी येवुन कॉलेजच्या मुलांचे होस्टेल मध्ये मोबाईल चोरी करीत असल्याचे सांगितले आहे. पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. महेद्र पाटील हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत तरवडे सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री शिरीष सरदेशपांडे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.एम.एम.पाटील सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील व तपास पथकाचे कर्मचारी पोलीस हवालदार विनोद भंडलकर, श्रीधर पाटील, गणेश सुतार, उज्वल मोकाशी, प्रणव संकपाळ, समीर बागसिराज, हर्षल शिंदे, जगदिश खेडकर, शिवदत्त गायकवाड, यांचे पथकाने केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे